# तीन मुले

साने गुरुजी

रिया पब्लिकेशन्स्

**तीन मुले : साने गुरुजी**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शीतल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रविंद्र सावंत

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ॐकार मुद्रणालय, कोल्हापूर.

**आवृत्ती**
१५ ऑगस्ट, २०११

**किंमत**
रुपये २००/-

© सदर पुस्तकातील मजकुराचा हक्क मुक्त आहे; परंतु या पुस्तकातील मांडणी, मुखपृष्ठ किंवा एकंदरीत रचना यांची नक्कल करता येणार नाही, तसेच ट्रेसिंग किंवा निगेटिव्हच्या साहाय्याने छापताही येणार नाही. तसे आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

# अनुक्रमणिका

१. तीन मुले ........ ०५
२. बुधा ........ १६
३. मधुरी ........ २६
४. मंगा ........ ३७
५. तिघांची त्रेधा ........ ४६
६. झोपडीतील संसार ........ ६१
७. अस्वस्थ मंगा ........ ७६
८. समुद्राची हाक ........ ८९
९. मंगाचे प्रयाण ........ १०६
१०. एकटी मधुरी ........ १२०
११. अशुभ वार्ता ........ १३१
१२. दिवाळी ........ १३९
१३ मी विचार करीन ........ १५१
१४. दुर्दैवी मंगा ........ १५९
१५. बुधाचा संसार ........ १६७
१६. घरच्या मार्गावर ........ १७७
१७. एक मुशाफीर ........ १८४
१८. आजारी ........ १९३
१९. आशीर्वाद ........ २०१

✦✦

# तीन मुले

सारंग गावची ही गोष्ट आहे. सारंग गाव समुद्राकाठी होता. मोठा सुखी, समृद्ध गाव. दर्यावर्दी व्यापार तेथे फार चाले. तेथून मालाने भरलेली गलबते दूर देशात जात व दूर देशांची मालाने भरलेली गलबते तेथे येत. बंदर नेहमी गजबजलेले असे. देशोदेशीचे खलाशी येत. एकदोन दिवस मुक्काम करीत. पुन्हा जात. कधी वादळ असले, समुद्र खवळलेला असला म्हणजे ते अधिक दिवसही तेथे राहात. अशा वादळात गलबते फुटत, प्राणहानी होई. गलबतातील तरंगता माल तीरास येऊन लागे. एकदा नारळांनी भरलेली गलबते वादळात फुटली. हजारो नारळ सारंग गावाच्या किनाऱ्यावर येऊन पडले. लोकांनी पोती भरभरून नेले. खाववत ना म्हणून ते फोडून गुराढोरांना त्यांनी खायला घातले. इतक्या नारळांचे काय करावे हे लोकांना कळेना. एकदा आंब्याची गलबते फुटली व हजारो कलमी आंबे किनाऱ्याला येऊन लागले. लोकांनी आंबे पाट्या भरभरून नेले. कधी कधी मेलेले खलाशी, मेलेली माणसेही किनाऱ्याला येऊन लागत. त्यांचे देह माशांनी खाल्लेले असत. ते देह पाहून भीती वाटे. गावातील कोणीतरी येत व त्या देहास मूठमाती देत. कधी एखादा जिवंत मनुष्यही किनाऱ्याला येऊन लागे. नावेच्या फुटक्या तुकड्याचा आधार घेऊन अथांग सागरातून तो किनारा गाठी. सारा गाव मग त्याच्या भोवती जमा होई व अंगावर काटे आणणाऱ्या त्याच्या गोष्टी ऐके.

सारंग बंदर दिसे मोठे छान. समुद्रावर दाट नारळीची बने होती. नारळी सारख्या डोलत असत. त्या नारळीच्या बनांच्या मधून व्यापाऱ्यांच्या वखारी असत. मधूनमधून लहानमोठ्या खनावळी होत्या. त्या खानावळींपैकी एक खानावळ एका म्हाताऱ्या आजीबाईंची होती. त्या आजीबाईला कोणी नव्हते. ती एकटीच होती. कोणी एखादा मुशाफीर येई व तिच्या एकटीचे जीवन अशा रीतीने पार पडे. समुद्राकाठी खेळायला येणारी मुले या आजीबाईंकडे यावयाची. म्हातारी त्यांना खाऊ द्यायची. कधी ती त्यांना एखादी गोष्ट सांगायची. ती मुले म्हणजे त्या म्हातारीची करमणूक होती.

अशा अनेक मुलांपैकीच ती तीन मुले होती. दोन होते मुलगे. एक होती मुलगी. मुलांची नावे बुधा व मंगा. मुलीचे नाव मधुरी. मधुरी व मंगा जवळजवळ राहात असत. बुधाचे घर लांब होते. मधुरी व मंगा या दोघांची बुधाजवळ समुद्राच्या किनाऱ्यावरच ओळख झाली. एके दिवशी मधुरी व मंगा समुद्राच्या वाळूत खेळत होती. वाळूत किल्ले बांधीत होती; परंतु किल्ला टिकेना. किल्ला सारखा पडे.

''तुला येतच नाही बांधता.'' मधुरी म्हणाली.

''तू तरी दाखव बांधून!'' मंगा चिडून म्हणाला.

''मुली वाटतं किल्ले बांधतात?'' हसून मधुरीने विचारले.

''मुलींना फक्त दुसऱ्याला हसता येते.'' मंगा म्हणाला.

या दोघांचे असे भांडण चालले होते. जवळच एक मुलगा येऊन उभा राहिला होता. तो त्या दोघांकडे पाहात होता. शेवटी त्याच्याने बोलल्यावाचून राहवेना. तो पुढे झाला व म्हणाला, ''मी देऊ का किल्ला बांधून?''

''मला येत नाही. तुला का येईल?'' मंगा म्हणाला.

''हो, येईल.'' तो म्हणाला.

''दे बांधून.'' मधुरी म्हणाली.

''आपण दोघे मिळून बांधू.'' मंगा त्या मुलाला म्हणाला.

''चालेल.'' तो म्हणाला.

''पण तुझे नाव काय?'' मधुरीने विचारले.

''बुधा.'' तो म्हणाला.

''माझे नाव मधुरी.'' ती म्हणाली.

''माझे नाव मंगा.'' मंगाने सांगितले.

''ये मंगा, किल्ला बांधू.'' बुधा उत्साहात म्हणाला.



''दोघे मिळून माझ्यासाठी किल्ला बांधा.'' मधुरी म्हणाली.

''तू जणू किल्ल्याची राणी.'' मंगा म्हणाला.

''आणि आपण?'' बुधाने विचारले.

''आपण राणीचे चाकर, रडवणाऱ्या राणीचे नोकर.'' मंगा म्हणाला.

''आता बोलू नका. बांधा लवकर किल्ला.'' मधुरीने सांगितले.

आणि फारच सुंदर किल्ला त्यांनी बांधला. त्या किल्ल्याकडे तिघं पाहात होती. परंतु एकदम किल्ला ढासळला! पडला ! तिघांना वाईट वाटले.

''वाळूचे किल्ले टिकत नाहीत.'' बुधा बोलला.

''आपण रोज नवीन बांधू.'' मंगा म्हणाला.

''रोज नवा खेळ.'' मधुरी म्हणाली.

''मी रोज तुमच्यात खेळायला येत जाईन.'' बुधा म्हणाला.

''ये.'' मधुरी म्हणाली.

''तुझे मित्र नाहीत का?'' मंगाने विचारले.

''मला कोणी नाही मित्र. मी एकटाच येतो किनाऱ्यावर.'' बुधाने सांगितले.

''तुझे घर कोठे आहे?'' मधुरीने विचारले.

''तिकडे लांब आहे. मोठे तीन मजली घर.'' बुधा म्हणाला.

''त्या घराभोवती बाग आहे, हो ना?'' मधुरीने विचारले.

''हो.'' बुधाने उत्तर दिले.

''तू श्रीमंत आहेस.'' मधुरी म्हणाली.

''आम्ही गरीब आहोत.'' मंगा म्हणाला.

''मी निरनिराळे खेळ आणीत जाईन. खाऊ आणीत जाईन. आपण एकत्र खेळू, एकत्र खाऊ खाऊ. आपण तिघं मित्र.'' बुधा म्हणाला.

अशी त्या तिघा मुलांची ओळख झाली. दिवसेंदिवस ओळख दृढ होत गेली. एकमेकांशिवाय त्यांना करमत नसे. संध्याकाळी तिघे समुद्रावर येत. समुद्राकाठी एक लहानशी वाळूची टेकडी होती. त्या टेकडीवर तिघे बसत. दुरून समुद्र हसे. कधीकधी त्या टेकडीवरून खाली घसरत जाण्याचा खेळ ती खेळत. मंगा व मधुरी एकमेकांचा हात धरून झरकन घसरत खाली जात; परंतु त्यांचा हात धरावयास बुधा धजत नसे.

''बुधा, मी मध्ये बसते. उजव्या बाजूस मंगा बसेल व डाव्या बाजूला तू. एक हात तू धर, एक हात मंगा धरील. आपण तिघे घसरत खाली जाऊ.'' मधुरी म्हणाली.

त्याप्रमाणे तिघे बसली. एक, दोन, तीन करून घसरगुंडी सुरू झाली. परंतु बुधा मध्येच थबकला. मंगा खाली गेला. बुधा वरच राहिला. मधुरीच्या हातांची ओढाताण झाली. शेवटी मंगाने त्या दोघांना ओढले. बुधाने मधुरीचा हात सोडला. मधुरी व मंगा खाली जाऊन उभी राहिली. बुधा ओशाळला व रडवेला झाला.

''बुधा, तू भित्रा आहेस.'' मंगा म्हणाला.

''श्रीमंतांची मुले भित्री असतात.'' मधुरी म्हणाली.

''मधुरी, तू एकटीच माझा हात धर. बघ येतो की नाही खाली घसरत. मी भित्रा नाही.'' बुधा म्हणाला.

आणि मधुरीने बुधाचा हात धरला. दोघे घसरत खाली गेले. बुधाचे तोंड फुलले. आपण भित्रा नाही असे त्याने दाखवले.

एके दिवशी बुधाने सुंदर पतंग आणला होता. मंगाने खूप उडविला; परंतु बुधाला उडविता येईना. मंगा त्याला चिडवू लागला. बुधा रडू लागला.

''बुधा, रडतोस काय मुलीसारखा?'' मधुरी म्हणाली.

''रडू नको तर काय करू?'' तो म्हणाला.

''घे पतंग उडव.'' ती म्हणाली.

''आपण दोघे मिळून उडवू ये. तू पण दोरा धर. म्हणजे मला धीर येईल. तू अशी दूर उभी राहून बघू नकोस. ये ना गं मधुरी.'' तो म्हणाला.

आणि त्या दोघांनी मिळून पतंग उडविला. तो खूप उंच गेला. बुधा आनंदला. मंगा नेहमी नवीन नवीन खेळ शोधून काढी. तो चपळ होता, खेळकर व उत्साही होता. भय त्याला माहीत नसे. तो वानरासारखा नारळाच्या झाडावर चढे. तो माशाप्रमाणे समुद्राच्या पाण्यात नाचे. तो वाटेल तेथून उडी टाकी. परंतु बुधा सौम्य होता, शांत होता.

त्या दिवशी समुद्रास भरती आली होती. त्या लाटांकडे तिघे बघत होती.

''मधुरी, मी जातो पाण्यात.'' मंगा म्हणाला.

''संध्याकाळ होत आली. आता नको जाऊस.'' बुधा म्हणाला.

''जाणार मी. जाणार.'' मंगा उड्या मारीत म्हणाला.

आणि तो पाण्यात गेला. तो लाटांशी खेळू लागला. मध्येच मोठी लाट येई आणि मंगा दिसेनासा होई. दोन लाटांच्या मधल्या खळग्यात तो नाचत राही. जणू पाळण्यातच आहे. तरंगमय पाळण्यात. सागरसंगीत चालले होते. तरंगाच्या पालखीत



बाळ नाचत होते. मंगा आनंदाने मस्त झाला होता. परंतु आता अंधार पडू लागला. पाण्यातील मंगा दिसेना. मधुरी हाका मारू लागली. परंतु समुद्राच्या गर्जनांमुळे ती हाक त्याला थोडीच ऐकू जाणार होती?

''मधुरी, आपण चल जाऊ. मला घरी रागावतील. उशीर झाला.''

''मंगाशिवाय आपण कसे जायचे?''

''तो आपणास सोडून कशाला पाण्यात गेला?''

''परंतु तो सुरक्षित येईपर्यंत आपणास थांबायला नको का?''

''मला येथे भीती वाटते.''

''मी आहे ना जवळ. माझा हात धर.''

मधुरीचा हात धरून बुधा उभा होता. थोड्या वेळाने मंगा आला. तो कोरडे नेसला.

''किती रे वेळ लावलास? आम्हाला काळजी.'' मधुरी म्हणाली.

''काळजी कसली? समुद्र म्हणजे मला गंमत वाटते. हजारो हातांनी समुद्र मला खेळवतो, नाचवतो.'' मंगा म्हणाला.

''चला आता जाऊ.'' बुधा म्हणाला.

''येथेच उभे राहू आपण. अंधारात उभे राहू.'' मंगा म्हणाला.

''मला घरी रागावतील.'' बुधा म्हणाला.

''मला घरी रागावले तरी मी त्याची कधी पर्वा करीत नाही.'' मंगा म्हणाला.

''मला घरी बोलतात, परंतु मी मनावर घेत नाही.'' मधुरी म्हणाली. शेवटी तिघं निघून गेली.

त्या दिवशी बुधाने खारका आणल्या होत्या.

''बुधा, मजजवळ दे. मी वाटते.'' मधुरी म्हणाली.

''मीच वाटतो.'' तो म्हणाला.

''पण माझ्याजवळ दिल्यास म्हणून रे काय झाले?'' ती म्हणाली.

''माझ्याच हाताने मी देईन.'' तो म्हणाला.

त्याने मधुरीला तीन खारका दिल्या. मंगाला दोन दिल्या, स्वत:ला तीन घेतल्या.

''मंगाला दोनच का?'' तिने विचारले.

''आठच होत्या. कोणाला तरी एक कमीच येणार.'' बुधा म्हणाला.

''येताना नऊ का आणल्या नाहीस?'' मंगाने विचारले.

''माझ्या नाही आले ध्यानात.'' बुधाने उत्तर दिले.